प्रश्नोपनिषद्

प्रथमः प्रश्नः

ॐ - प्रत्येक उपनिषदाचे प्रारंभ परमेश्वराच्या स्मरणाने करण्याची प्रथा आहे.

ॐ सुकेशा च भारद्वाजः शैब्यश्च सत्यकामः सौर्यायणी

च गार्ग्यः कौसल्यश्च अश्वलायनो भार्गवो वैदर्भिः कबन्धी

कात्यायनस्ते हैते ब्रह्मपरा ब्रह्मनिष्ठाः परं ब्रह्मान्वेषमाणा

एष ह वै तत्सर्वं वक्ष्यतीति ते ह समित्पाणयो भगवन्तं पिप्पलादमुपसन्नाः ॥ १ ॥

भारद्वाजः सुकेशा - भारद्वाज पुत्र सुकेशा च शैब्यः सत्यकामः - शिबीचा पुत्र सत्यकाम च गार्ग्यः सौर्यायणी - गर्ग कुलोत्पन्न सौर्यायणी च कौसल्यः अश्वलायनः - कोसलदेशीचा अश्वलायन च वैदर्भिः भार्गवः - विदर्भ निवासी भार्गव कात्यायनः कबन्धी - कत्य ऋषिचा प्रपौत्र कबन्धी ते ह एते ब्रह्मपरा ब्रह्मनिष्ठाः - हे सहा ऋषि वेदपरायण तसेच वेदांमध्ये निष्ठा असलेले होते. ते ह परं ब्रह्म अन्वेषमाणाः - ते सर्व परब्रह्म ज्ञानाचा शोध घेत असता एषः ह वै तत्सर्वं वक्ष्यति इति - हे (पिप्पलाद ऋषि) निश्चितपणे त्या परब्रह्माबद्दल सर्व काहीं सांगतील अशी श्रद्धा ठेऊन ते ह समित्पाणयो भगवन्तं

पिप्पलादमुपसन्नाः - हातांत समिधा घेऊन (समर्पण भावनेने) भगवान पिप्पलाद ऋषिंकडे गेले. ॥ १ ॥

तान् ह स ऋषिरुवाच भूय एव तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया

संवत्सरं संवत्स्यथ यथाकामं प्रश्नान् पृच्छत यदि

विज्ञास्यामः सर्वं ह वो वक्ष्याम इति ॥ २ ॥

तान् ह सः ऋषिः उवाच - त्या सहा ऋषीपुत्रांना ते प्रसिद्ध पिप्पलाद ऋषी म्हणाले भूयः एव तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया संवत्सरं संवत्स्यथ - (पिप्पलाद ऋषींना माहीत होते की आलेले सर्व ऋषीपुत्र तपस्वी व वेदनिष्ठ आहेत. तरीपण गुरुंकडून उपदेश घेण्याकरिता ज्या शिष्यलक्षणांची आवश्यकता असते ती त्यांच्यात आहेत की नाहीत ह्याचा पडताळा घेण्याकरिता ते म्हणाले) तुम्हाला पुन्हा श्रद्धायुक्त, ब्रह्मचर्याचे पालन करीत एक वर्ष तपश्चर्या करीत राहावे लागेल. यथाकामं प्रश्नान् पृच्छत - त्यानंतर आपापल्या इच्छेप्रमाणे काय विचारायचे आहे ते विचारा. यदि विज्ञास्यामः सर्वं ह वो वक्ष्याम इति - तुम्ही जे विचाराल ते मी जर जाणत असेन तर ते सर्व निस्संदेह मी तुम्हाला सांगेन ॥ २॥

अथ कबन्धी कात्यायन उपेत्य पप्रच्छ ।

भगवन् कुतो ह वा इमाः प्रजाः प्रजायन्त इति ॥ ३ ॥

अथ कबन्धी कत्यायनः उपेत्य प्रपच्छ - (एक वर्ष झाल्यावर) कत्य प्रपौत्र कबंधीने पिप्पलाद ऋषींजवळ जाऊन विचारले - भगवन् कुतः ह वा इमाः प्रजाः प्रजायन्त इति - भगवन् , चराचर विश्वात दिसण्याऱ्या चित्रविचित्र प्रजांच्या उत्पत्तीचे मूळ कारण (कुठून ? कशी ?) काय ? ॥ ३ ॥

तस्मै स होवाच प्रजाकामो वै प्रजापतिः

स तपोऽतप्यत स तपस्तप्त्वा स मिथुनमुत्पादयते।

रयिं च प्राणं च इति, एतौ मे बहुधा प्रजाः करिष्यत इति ॥ ४ ॥

तस्मै सः ह उवाच् - ते सुप्रसिद्ध ऋषी त्याला म्हणाले , वै प्रजाकामः प्रजापतिः - (ह्या सर्व उपक्रमाच्या मागे) निश्चितपणे विविध प्रजांच्या उत्पत्तीची इच्छा असलेला प्रजापती आहे. सः तपः अतप्यत - त्यासाठी त्याने तप केले. सः तपः तप्त्वा मिथुनम् उत्पादयते - त्याने तप करून सृष्टीच आरंभ केला आणि सुरुवातीला एक जोडी उत्पन्न केली. रयिम् च प्राणम् च - एक रयि (प्रतिनिधी स्वरूप चन्द्र) आणि दुसरा प्राण (प्रतिनिधी स्वरूप सुर्य) एतौ मे बहुधा प्रजाः करिष्यत इति - हे दोन उत्पन्न करायचा उद्देश म्हणजे हे दोन्ही मिळून माझ्यासाठी विविध प्रकारची प्रजोत्पत्ती करतील. (ब्रह्मानें उत्पन्न केलेल्या ह्या जोडीला अग्नि / सोम , पुरुष / प्रकृती ,

धन / ऋण इ. नावानेंही ओळखले जाते. इथून पुढें साधारणपणें एक अगोचर अशी चेतन शक्ति अज्ञात आत्मतत्त्वाशी जुडलेली असते व दुसरी म्हणजे ज्ञानेंद्रियांना गोचर असणारे, त्यांच्या शक्तिसहीत सर्व पदार्थ [काम्य / भोग्य धरून] म्हणजे -रयि- अशा अर्थाने घेतलेले दिसतात) ॥ ४ ॥

आदित्यो ह वै प्राणो रयिरेव चन्द्रमा रयिर्वा एतत्

सर्वं, यन्मूर्तं च अमूर्तं च तस्मान्मूर्तिरेव रयिः ॥ ५ ॥

ह आदित्यः वै प्राणः चन्द्रमा एव रयिः - निश्चितपणे हा सुर्य म्हणजे प्राण आणि चन्द्रमा म्हणजे रयिः होय. यत् मूर्तम् च अमुर्तम् च जे काही आकाररूप असलेले आणि जे काही आकाररहीत आहे (आकाश, वायु वगैरे) एतत् सर्वं वै रयिः - हे सर्वच्या सर्व म्हणजे जे कांही पंचेंद्रियाना गोचर होऊं शकते - (दृश्य वा अदृश्य) ते म्हणजे रयि होय. ॥ ५ ॥

अथादित्य उदयन् यत् प्राचीं दिशं प्रविशति तेन प्राच्यान्

प्राणान् रश्मिषु सन्निधत्ते । यद्दक्षिणां यत् प्रतीचीं

यदुदीचीं यद् अधो यद् ऊर्ध्वं यदन्तरा दिशो यत्

सर्वं प्रकाशयति तेन सर्वान् प्राणान् रश्मिषु सन्निधत्ते ॥ ६ ॥

अथ उदयन् आदित्यः यत् प्राचीम् दिशम् प्रविशति - उजाडता सुर्य जेव्हां पूर्व दिशेंत प्रवेश करतो - तेन् प्राच्यान् प्राणान् रश्मिषु सन्निधत्ते - तेव्हां तो पूर्व दिशेकडील सर्व प्रांत आपल्या किरणांनी प्रकाशीत करीत प्राणतत्त्वाने आच्छादित करून टाकतो - यत् दक्षिणां यत् प्रतीचीम् यत् उदीचीम् तद्वत दक्षिण, पश्चिम आणि उत्तर भाग देखील प्रकाशतो - यत् अधः यत् उर्ध्वम् यत् अन्तरा दिशः यत् सर्वम् प्रकाशयति - तसेच खालच्या व वरच्या लोकांत आणि दिशांच्या मधल्या प्रदेशांतही. अशा रितीने सर्व भाग प्रकाशित करतो. तेन सर्वान् प्राणान् रश्मिषु सन्निधत्ते - ते सर्व प्रांत आपल्या किरणांद्वारे प्राणमय करतो. ॥ ६ ॥

स एष वैश्वानरो विश्वरुपः प्राणोऽग्निरुदयते ।

तद् एतद् ऋचाऽभ्युक्तम् ॥ ७ ॥

सः एषः उदयते - हा सूर्य उगवतो आणि - वैश्वानरः अग्निः विश्वरूपः प्राणः - प्राणीमात्रांच्यात वैश्वानर अग्नि स्वरूपांत व सृष्टींत विश्वरूप प्राण स्वरूपांत प्रतिष्ठीत राहातो - तत् एतत् ऋचा अभ्युक्तम् - हीच गोष्ट पुढे ऋचाद्वारे सांगितली गेली आहे. ॥ ७ ॥

विश्वरूपं हरिणं जातवेदसं परायणं ज्योतिरेकं तपन्तम् ।

सहस्त्ररश्मिः शतधा वर्तमानः प्राणः प्रजानामुदयत्येष सूर्यः ॥ ८ ॥

विश्वरूपम् जातवेदसम् परायणम् ज्योतिः तपंतम् - सर्व विश्वाच्या केंद्रस्थानी, सर्वज्ञ असा, सर्वांचा आधार होत, हा प्रकाशमय सुर्य स्वताः तप्त होत असतो - हरिणम् एकम् एषः सहस्त्ररश्मिः सुर्यः - हजारो किरण असलेला हा सुर्य एकटाच - शतधा वर्तमानः प्रजानाम् प्राणः उदयति - शेकडो प्रकारे सर्व प्राणीमात्रांचे जीवन बनून विचरत असतो. ॥८॥

संवत्सरो वै प्रजापतिः तस्यायने दक्षिणं चोत्तरं च ।

तद्ये ह वै तदिष्टापूर्ते कृतमित्युपासते ते चान्द्रमसमेव

लोकमभिजयन्ते । त एव पुनरावर्तन्ते तस्मादेत ऋषयः

प्रजाकामा दक्षिणं प्रतिपद्यन्ते । एष ह वै रयिर्यः पितृयाणः ॥ ९ ॥

इथवर "प्रजेची उत्पत्ती कुठून ? त्याचे मूळ कारण ? " ह्याविष्यीं वर्णन झाले. इथून पुढें " कशी ? " बद्दल विवेचन.

संवत्सरः वै प्रजापतिः - बारा महिने असलेला संवत्सर निश्चित्पणे काळरूपी प्रजापती आहे. तस्य अयने दक्षिणम् च उत्तरम् च - त्याचे दक्षिण व उत्तर असे दोन अयने आहेत. तत् इष्टापुर्ते वै कृतम् इति उपासते - या मनुष्यलोकांत इष्ट

कामनांच्या पूर्तीसाठी कारावयाला लागणाऱ्या कर्मांना 'योग्य कर्मे' मानून जे उपासना करतात - ते चान्द्रमसम् लोकम् एव अभिजयन्ते - ते अंतसमयी चन्द्रलोकांत जातात - ते एव पुनः आवर्तन्ते - आणि ते परत मनुष्य लोकंत येतात. तस्मात् एते प्रजाकामाः ऋषयः दक्षिणम् प्रतिपद्यन्ते - म्हणून सन्तान इच्छुक ऋषी दक्षिण मार्गानें जातात. एषः वै रयिः यः पितृयाणः - याला पितृयाण मार्ग म्हणतात. निस्सन्देह तो रयि होय. ॥ ९ ॥

अथोत्तरेण तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया विद्यया

आत्मानं अन्विष्य आदित्यं अभिजयन्ते ।

एतद्वै प्राणानां आयतनं एतद् अमृतं अभयं एतत् परायणं

एतस्मान्न पुनरावर्तन्त इत्येष निरोधस्तदेष श्लोकः ॥ १० ॥

अथ तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया विद्यया आत्मानम् अन्विष्य - पण जे तप तथा ब्रह्मचर्येचे पालन करीत, श्रद्धेने, अध्यात्मविद्येने, सुर्यरूपी परत्म्याचा शोध घेण्यात जीवन सार्थक करतात , ते अंतसमयीं उत्तरमार्गाने सुर्यलोकात जातात. एतत् वै प्राणानम् आयतनम् एतत् अमृतम् अभयम् - प्राणांचा प्रतिष्ठान असलेला सुर्य हे अविनाशी आणि निर्भय पद आहे. - एतत् परायणम् - उत्तर दिशेने जाणे म्हणजे परमगतीच. एतस्मात् न

पुनरावर्तन्ते - तिथे जे जातात ते परत येत नाहीत. इति एषः निरोधः - म्हणजेच पुनरावर्तनाचा तिथे निरोध होतो. तत् एषः श्लोक - हीच गोष्ट आणखी स्पष्ट करण्याकरता पुढील श्लोक. || १० ||

पञ्चपादं पितरं द्वादशाकृतिं दिव आहुः परे अर्धे पुरीषिणम्।

अथेमे अन्य उ परे विचक्षणं सप्तचक्रे षडर आहुरर्पितमिति || ११ ||

पंचपादम् पितरम् द्वादशाकृतिम् - कांही विद्वानांचे म्हणणे आहे की काळरूपी हा सुर्य पांच चरण असलेला (हेमंत आणि शिशीर एकत्रित असा एक , आणि उरलेले चार असे एकूण पांच ऋतु म्हणजे पांच चरण), सर्वांचा पिता (पालनकर्ता) आणि प्रत्येक महिन्याची एक शरीर आकृति अशा बारा आकृत्या असलेला पुरीषिणम् दिवः परे अर्धे आहुः - जलाची उत्पत्ती करणारा आणि स्वर्गलोकाच्याही पलिकडचा असा आहे. अथ इमे अन्य उ परे सप्तेचक्रे षडरे - इतर कांही विद्वान ह्याला सात चक्रे असलेला असून प्रत्येक चक्राला ऋतुरुपी सहा आरे असलेला , अर्पितम् विचक्षणम् इति आहुः - तसेच सर्वांचे ज्ञान असलेला असा आहे. इथेही हा काळरूपी असून गतिमान आहे म्हणून त्याला प्रजापती असे म्हटलेले आहे. || ११ ||

मासो वै प्रजापतिः तस्य कृष्णपक्ष एव रयिः शुक्लः प्राणः

तस्मादे तद् ऋषयः शुक्ल इष्टिं कुर्वन्ति इतर इतरस्मिन् ॥ १२ ॥

मासः वै प्रजापतिः - महिना (परत काळच की) हा देखील प्रजापती आहे. तस्य कृष्णः पक्षः एव रयिः शुक्ल प्राणः - महिन्याचे दोन पक्ष असतात. एक कृष्णपक्ष ज्याला रयि म्हणतात आणि दुसरा जो शुक्लपक्ष , तो म्हणजे प्राण तस्मात् एते ऋषयः शुक्ल इष्टिम् कुर्वन्ति - म्हणून कल्याणेच्छु ऋषिगण निष्कामभावनेने यज्ञादि कर्तव्यकर्मे शुक्लपक्षात करतात इतर इतरेस्मिन् - पण इतर प्रापंचिक देखिल जरी कृष्णपक्षांतही शुभकर्मे करीत असले तरी ती सर्व कर्मे बहुधा सकामच असतात. ॥ १२ ॥

अहोरात्रो वै प्रजापतिः तस्याहरेव प्राणो रात्रिरेव रयिः

प्राणं वा एते प्रस्कन्दन्ति ये दिवा रत्या संयुज्यन्ते

ब्रह्मचर्यमेव तद्, यद् रात्रौ रत्या संयुज्यन्ते ॥ १३ ॥

अहोरात्रौ वै प्रजापतिः - दिवसरात्रीच्या जोडीलाही प्रजापती म्हणतात. तस्य अहः एव प्राण रात्री एव रयिः - पैकी दिवसाला प्राण व रात्रीला रयि म्हणतात. कांही विद्वान म्हणतात दिवस म्हणजे भोक्ता व रात्र म्हणजे भोग्य. ये दिवा रत्या संयुज्यंते एते वै प्राणम् प्रस्कंदंति - जे दिवसा स्त्री सहवास करतात ते आपल्या प्राणरूपी शक्तीला क्षीण करतात. यत् रात्रौ रत्या

संयुज्यंते तत् ब्रह्मचर्यम् एव - व जे फक्त रात्री स्त्री-सहवास करतात ते ब्रह्मचारी तुल्य होत. ॥ १३ ॥

अन्नं वै प्रजापतिः ततो ह वै तद् रेतः

तस्मादिमाः प्रजाः प्रजायन्त इति ॥ १४ ॥

अन्नम् ह वै प्रजापतिः ततः वै तत् रेतः - अन्नालाही प्रजापती म्हटले आहे. कारण प्रजोत्पत्तीसाठी आवश्यक असे वीर्य अन्नापासूनच उत्पन्न होते. तस्मात् इमाः प्रजाः प्रजायंत इति - या वीर्यापासून हे संपूर्ण चराचर प्राणी उत्पन्न होतात. ॥ १४ ॥

तद्ये ह वै तत् प्रजापतिव्रतं चरन्ति ते मिथुनमुत्पादयन्ते।

तेषामेवैष ब्रह्मलोको येषां तपो ब्रह्मचर्यं येषु सत्यं प्रतिष्टितम् ॥ १५ ॥

तत् ये ह वै तत् प्रजापतिव्रतम् चरन्ति - जे कोणी निश्चयपूर्वक त्या प्रजापती व्रताचे आचरण करतो ते मिथुनम् उत्पादयन्ते - ते जोडीने प्रजोत्पत्ती करतात. येषाम् तपः ब्रह्मचर्यम् येषु सत्यम् प्रतिष्ठितम् - जे तपस्वी व ब्रह्मचर्येचे पालन करणारे आहेत तेषाम् एषः ब्रह्मलोकः - त्यांनाच ब्रह्मलोकाची प्राप्ती होते. ॥ १५ ॥

तेषामसौ विरजो ब्रह्मलोको

न येषु जिह्ममनृतं न माया चेति ॥ १६ ॥

येषु न जिन्हम् न् माया - जे चुकूनही असत्य बोलत वा वागत नाहीत आणि ज्यांच्यात कुटीलपणाचा लवलेशही नाही तेषाम् असौ विरजो ब्रह्मलोकः इति - अशांनाच विशुद्ध आणि विकाररहीत ब्रह्मलोकाची प्राप्ती होते. ॥ १६ ॥

इति प्रश्नोपनिषदि प्रथमः प्रश्नः ॥

प्रश्नोपनिषद्

द्वितीयः प्रश्नः

अथ हैनं भार्गवो वैदर्भिः पप्रच्छ ।

भगवन् कत्येव देवाः प्रजां दिधारयन्ते ?

कतर एतत् प्रकशयन्ते ? कः पुनरेषां वरिष्ठ इति ॥ १ ॥

अथ ह एनम् वैदर्भिः भार्गवः प्रपच्छ - यानंतर ह्या महान् ऋषींना विदर्भदेशीय भार्गवाने विचारले - भगवन् , कति देवाः एव प्रजां विधारन्ते - भगवन् , एकूण किती देवता ह्या प्रजेला धारण करतात (आधार देतात)- कतरे एतत् प्रकाशयन्ते - यापैकीं कोणकोण ह्यांना प्रकाशित करतात - पुनः एषाम् कः वरिष्ठः

इति - आणि भगवन् परत हेंही सांगावे कि त्या सर्वांमध्ये वरिष्ठ देवता कोण ? ॥ १ ॥

तस्मै स होवाच - आकाशो ह वा एष देवो वायुरग्निराप:

पृथिवी वाङ्मनश्चक्षु: श्रोत्रं च । ते प्रकाश्याभिवदन्ति । वयं एतद्बाणमवष्टभ्य विधारयाम: ॥ २ ॥

सः ह तस्मै उवाच - ते महान् ऋषी भार्गवाला म्हणाले - ह आकाशः वै एषः देवः - निश्चितपणे हे महान आकाश ही एक देवता आहे - वायुः अग्निः आपः पृथिवी वाक् चक्षुः च श्रोत्रं मनः - तसेच वायु, अग्नि, जल, पृथ्वी, वाणी (व इतर कर्मेंद्रिये), नेत्र आणि कर्ण (इ. ज्ञानेंद्रिये) तथा अंतःकरण चतुष्टय, ह्याही देवता होत. पंचमहाभूतांचे शरीर बनत असल्यामुळे ही पांच महाभूते, तसेच कर्मेंद्रिये, ज्ञानेंद्रिये व अंतःकरण चतुष्टयाने हे शरीर व्यवहार करतें म्हणून या चवदा देवता सर्व काही प्रकाशित करतात असें म्हटलें आहे. - ते प्रकाश्य अभिवदन्ति - या सर्व देवता आपापल्या शक्तींचे प्रदर्शन करीत अभिमानाने म्हणतात, - वयम् एतत् बाणम् अवष्टभ्य विधारयामः - आम्हींच ह्या शरीराला आश्रय देऊन देह धारण करतो. ॥ २ ॥

तान् वरिष्ठ: प्राण उवाच । मा मोहमापद्यथ । अहं एवैतत्

पञ्चधाऽऽत्मानं प्रविभज्य एतद् बाणमवष्टभ्य विधारयामीति । तेऽश्रद्दधाना बभूवु: ॥ ३ ॥

तान् वरिष्ठ प्राण उवाच - या सर्वांत श्रेष्ठ असलेला प्राण त्या गर्व झालेल्या इतर देवतांना म्हणाला, - मा मोहम् आपद्यत अहम् एव एतत् आत्मानम् प्रविभज्य - भलत्या भ्रमांत राहुं नका , मी माझा स्वरूपाची पांच भागात विभागणी करून - एतत् बाणम् अवष्टभ्य विधारयामि - मी ह्या शरीराचा आश्रय बनून हे शरीर धारण करतो - ते अश्रद्धधाना बभूवः इति - असे ऐकूनही त्यांचा त्या वक्तव्यावर विश्वास न बसून ते आपल्याच तोऱ्यात राहीले. ॥ ३ ॥

सोऽभिमानाद् ऊर्ध्वं उत्क्रामत इव तस्मिन् उत्क्रामति

अथ इतरे सर्व एव उत्क्रामन्ते तस्मिंश्च प्रतिष्ठमाने सर्व एव प्रातिष्ठन्ते ।

तद्यथा मक्षिका मधुकरराजानं उत्क्रामन्तं सर्व एव उत्क्रामन्ते तस्मिंश्च प्रतिष्ठमाने

सर्वा एव प्रातिष्टन्ते एवं वाङ्मनश्चक्षुः श्रोत्रं च ते प्रीताः प्राणं स्तुन्वन्ति ॥ ४ ॥

सः अभिमानात उर्ध्वम् इव उत्क्रमते - त्या देवतांना आपली जागा दाखविण्याच्या मिशेने) तो प्राण शरीराबाहेर जेल्यासारखी कृति करतो - तस्मिन् उत्क्रामति अथ इतर सर्वे एव उत्क्रामन्ते - तो प्राण जरासा शरीराबाहेर गेल्यावर इतर सर्व देवताही त्यांचा आधार तुटल्यासारखे झाल्यामुळे बाहेर

पडल्या. - च तत् प्रतिष्ठमाने सर्वे एव प्रातिष्ठन्ते - तो परत शरीरात स्थीर झाल्यावर सर्व देवता परत स्थीर झाल्या. - तत् यथा मधुकरराजानम् उत्क्रामंतम् सर्वा एव मक्षिका उत्क्रामन्ते - मधमाश्यांचा राजा [का राणी ?] जसा आपल्या स्थानावरून उडाला की इतर सर्व मधमाश्याही तिच्या पाठीमागून उडतात - च तस्मिन् प्रतिष्ठमाने सर्वा एव प्रातिष्ठन्ते - आणि ती मधमाश्यांची राणी खाली बसल्यावर जशा लगेच इतर सर्व माश्या खाली बसतात - एवम् वाक् चक्षुः श्रोत्रम् च मनः - अगदी त्याचप्रमाणे वाणी, नेत्र, कान, मन वगैरींची स्थिति झाली - ते प्रीताः प्राणम् स्तुवन्ति - त्या सर्व देवतांना आपापल्या मर्यादा कळल्या आणि प्राणाच्या श्रेष्ठतेचा अनुभव आला - नम्रपणे ते सर्व प्राणदेवतेची स्तुति करायला लागले. ॥ ४ ॥

एषोऽग्निस्तपत्येष सूर्य एष पर्जन्यो मघवानेष वायुः

एष पृथिवी रयिर्देवः सदसच्चामृतं च यत् ॥ ५ ॥

एषः तपति एषः सुर्यः - सर्वजण स्तुति करत म्हणायला लागले, हा प्राण अग्निरूपाने तप्त होतो. हाच सुर्य आहे. - एषः वायुः एषः देवः पृथिवी रयिः - हाच वायु आहे आणि हा प्राणदेवच पृथिवी व रयि आहे. - यत् सत् च असत् च अमृतम् - तसेच हा सत्, असत् आणि अमृतस्वरूपपरमात्मा आहे. ॥ ५ ॥

अरा इव रथनाभौ प्राणे सर्वं प्रतिष्ठितम् ।

ऋचो यजूँषि सामानि यज्ञः क्षत्रं ब्रह्म च ॥ ६ ॥

रथनाभौ अरा इव - रथचक्राच्या नाभीस्थानी असलेल्या आरेप्रमाणे - ऋचः यजूंषि सामनि यज्ञः च ब्रह्म क्षत्रियम् - ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेदातील मन्त्र, यज्ञ आणि ते करणारे ब्राह्मण व क्षत्रियही , - सर्वम् प्राणे प्रतिष्ठीतम् - हे सर्वच प्राणांत प्रतिष्ठित आहेत. ॥ ६ ॥

प्रजापतिश्चरसि गर्भे त्वमेव प्रतिजायसे ।

तुभ्यं प्राण प्रजास्त्विमा बलिं हरन्ति यः प्राणैः प्रतितिष्ठसि ॥ ७ ॥

प्राणः त्वम् एव प्रजापतिः - हे प्राणा ! तूंच प्राणीमात्रांचा ईश्वर प्रजापती आहेस - (त्वम् एव) गर्भे चरसि प्रतिजायसे - तूच गर्भ बनून जन्म घेतोस आणि तूच माता-पिता रुपाने जन्माला घालतोस - तु इमाः प्रजाः तुभ्यम् बलिम् हरन्ति - हे सर्व जीव तुलाच भेंट अर्पण करतात (उपासना करतात) - यः प्राणैः प्रतितिष्ठसि - तुंच आपल्या पांच भागांसहीत सर्वत्र प्रतिष्ठित असतोस. ॥ ७ ॥

देवानामसि वह्नितमः पितॄणांप्रथमा स्वधा ।

ऋषीणां चरितं सत्यं अथर्वाङ्गिरसामसि ॥ ८ ॥

देवानाम् असि वन्हितमः - देवतांना यज्ञातील हवी पोंचविणारा उत्तम अग्नि तूच आहेस - पितृणाम् प्रथमा स्वधा - पितरांच्या तृप्तीसाठी तर्पणही तूच आहेस - अथर्व अंगिरसाम् ऋषीणाम् चरितम् सत्यम् असि - श्रेष्ठ ऋषींच्या आचरणांतील सत्यत्त्वही तूच आहेस. ॥ ८ ॥

इन्द्रस्त्वं प्राण तेजसा रुद्रोऽसि परिरक्षिता ।

त्वमन्तरिक्षे चरसि सूर्यस्त्वं ज्योतिषां पतिः ॥ ९ ॥

प्राण त्वम् तेजसा इन्द्रः रुद्रः परिरक्षिता असि - हे प्राणा ! तेजाने सम्पन्न असा तारकदेव इन्द्र, संहारक रुद्र आणि पालनकर्ता विष्णू तूच आहेस - त्वम् अंतरिक्षे चरसि - तूच अंतरिक्षांत भ्रमण करीत - सुर्यः त्वम् ज्योतिषाम् पतिः - प्रकाशित करणाऱ्या सर्व देवतांमध्ये सुर्यरूपाने तूच सर्वात अधिक श्रेष्ठ आहेस. ॥ ९ ॥

यदा त्वमभिवर्षसि अथेमाः प्राण ते प्रजाः ।

आनन्दरूपास्तिष्ठन्ति कामायान्नं भविष्यतीति ॥ १० ॥

प्राण यदा त्वम् अभिवर्षसि - हे प्राणा ! तूं जेव्हां जलाचा वर्षाव करतोस - अथ ते इमाः प्रजाः कामाय अन्नम् भविष्यति - तेव्हां तुझी ही सर्व प्रजा आता मुबलक अन्नाची प्राप्ति होणार -

इति आनन्दरुपा तिष्ठन्ति - ह्या आशेने आनन्दी होतात. ॥ १० ॥

व्रात्यस्त्वं प्राण एकर्षिः अत्ता विश्वस्य सत्पतिः ।

वयमाद्यस्य दातारः पिता त्वं मातरिश्व नः ॥ ११ ॥

प्राणः त्वम् व्रात्यः एकर्षीः - हे प्राणा ! तूं सर्वथा संस्कारशून्य असून एकर्षी नावाचा ऋषी आहेस - वयम् आद्यस्य दातारः - आम्ही तुला लागणारे अन्न पुरविणारे आहोत - अत्ता विश्वस्य सत्पतिः - तूं त्या अन्नाचा भक्षक आहेस आणि सर्व जगताचा श्रेष्ठ स्वामी आहेस - मातरिश्व त्वम् नः पितः - हे वायुमय देवा, तूंच आम्हां सर्व देवतांचा पिता आहेस. ॥ ११ ॥

या ते तनूर्वाचि प्रतिष्ठिता या श्रोत्रे या च चक्षुषि ।

या च मनसि सन्तता शिवां तां कुरू मोत्क्रमीः ॥ १२ ॥

या ते तनु वाचि प्रतिष्ठिता च - तू वाणीमध्ये प्रतिष्ठीत आहेस - या श्रोत्रे या च चक्षुसि या मनसि संतता - तसेच डोळे, कान व मनामध्येही तूच व्याप्त आहेस - ताम् शिवाम् कुरु मा उत्क्रमी - हे सर्व तू मंगलमय करून टाक. तू कधीही आमचा त्याग करू नकोस. ॥ १२ ॥

प्राणस्येदं वशे सर्वं त्रिदिवे यत् प्रतिष्ठितम् ।

मातेव पुत्रान् रक्षस्व श्रीश्च प्रज्ञां च विधेहि न इति ॥ १३ ॥

इदम यत् त्रिदिवे प्रतिष्ठितम् - या जगतात जे काही आहे ते सर्व प्राणाने प्रतिष्ठित आहे - सर्वम् प्राणस्य वशे - सर्वकांही प्राणाच्या आधीन आहे - माता पुत्रान् इव रक्षस्व - हे प्राणा , मातेप्रमाणे तू आम्हां सर्वांचे रक्षण कर - श्रीः च प्रज्ञाम् च विधेहि इति - तसेच आम्हाला ऐश्वर्य व शुद्ध बुद्धी प्रदान कर. ॥ १३ ॥

इति प्रश्नोपनिषदि द्वितीयः प्रश्नः ॥

प्रश्नोपनिषद्

तृतीयः प्रश्नः

अथ हैनं कौशल्यश्चाश्वलायनः पप्रच्छ ।

भगवन् कुत एष प्राणो जायते ? कथं आयात्यस्मिन्शरीरे ?

आत्मानं वा प्रविभज्य कथं प्रातिष्ठते केनोत्क्रमते ?

कथं बाह्यमभिधत्ते कथमध्यात्ममिति ॥ १ ॥

अथ ह एनम् कौसल्यः अश्वलायनः च पप्रच्छ - यानंतर पिप्पलाद ऋषींना कोसलदेशीय अश्वलायनने विचारले -

भगवन्, एषः प्राणः कुतः जायते - हा प्राण कुठुन उत्पन्न होतो - अस्मिन् शरीरे कथम् आयाति - व या शरीरात तो कसा येतो - वै आत्मानम् प्रविभज्य कथम् प्रातिष्ठते - तसेच आपले विभाजन करून कशा प्रकारे स्थित होतो - केन उत्क्रमते - कशा प्रकारे शरीरांतून बाहेर पडतो - कथम् बाह्यम् अभिधत्ते - या (शरीराबाहेरील) विश्वाला कशा प्रकारे धारण करतो - कथम् अध्यात्मम् इति - तसेच शरीर जगतात (इन्द्रिये-मनाला) कशा प्रकारे धारण करतो. असा माझा प्रश्न आहे. ॥ १ ॥

तस्मै स होवाच - अतिप्रश्नान् पृच्छसि ब्रह्मिष्ठोऽसीति तस्मात्तेऽहं ब्रवीमि ॥ २ ॥

तस्मै सः ह उवाच - ऋषी म्हणाले - अतिप्रश्नान् पृच्छसि, ब्रह्मिष्ठ असि इति - तू फारच प्रश्न विचारतोस, म्हणजेच वेद चांगल्या प्रकारे जाणतोस - तस्मात् ते अहम् ब्रवीमि - आतां मी तुझ्या प्रश्नांची उत्तरे देतो. ॥ २ ॥

आत्मन एष प्राणो जायते । यथैषा पुरुषे छाया एस्मिन्

एतद् आततं मनोकृतेन आयाति अस्मिन् शरीरे ॥ ३ ॥

आत्मन एषः प्राणो जायते - हा प्राण आत्म्याच्या (इच्छेने) उत्पन्न होतो - एतत् एतस्मिन् आततम् - ह्या प्राणाला त्या

परमेश्वराचाच आश्रय आहे - अस्मिन् शरीरे मनोकृतेन आयाति - ह्या शरीरात मनाद्वारे केलेल्या संकल्पाने प्रवेश होतो. ॥ ३ ॥

यथा सम्राडेवाधिकृतान् विनियुङ्क्ते । एतान् ग्रामान् एतान् ग्रामान्

अधितिष्टस्व इति इवं एवैष प्राण इतरान् प्राणान् पृथक् पृथगेवसन्निधत्ते ॥ ४ ॥

यथा सम्राट् अधिकृतान् विनियुङ्क्ते - ज्या प्रमाणे चक्रवर्ती राजा वेगवेगळ्या प्रांतात अधिकारी नियुक्त करून - एतान् ग्रामान् एतान् ग्रामान् अधितिष्ठस्व - हे गांव तुम्ही पाहा, ह्या गावांत तुम्ही रहा असे सांगतो - एवम् एव एषः प्राणः - त्याच प्रमाणे हा प्राण - इतरान् प्राणान् पृथक् पृथक् एव सन्निधत्ते - इतर प्राणांना वेगवेगळ्या भागांत स्थापीत करतो. ॥ ४ ॥

पायूपस्थेऽपानं चक्षुःश्रोत्रे मुखनासिकाभ्यां प्राणः स्वयं प्रातिष्ठते मध्ये तु समानः ।

एष ह्येतद्धुतमन्नं समं नयति तस्मादेताः सप्तार्चिषो भवन्ति ॥ ५ ॥

प्राणः स्वयम् मुखनासिकाभ्यां (तथा) चक्षु श्रोत्रे प्रातिष्ठते - हा प्राण तोंड , डोळे, नाक व कान ह्या ठिकाणी स्वताः राहातो - पायु-उपस्थे अपानम् - गुदा आणि उपस्थ या ठिकाणी अपान

वायुला नियुक्त करतो - तु मध्ये समानः - प्राण आणि अपान वायुच्या क्षेत्राच्या) मधल्या भागात समान वायुला नियुक्त करतो - एषः हि एतत् हुतम् अन्नम् समम् नयति - हा वायु ह्या शरीराच्या प्राणाग्निला हवन केलेले अन्न सर्व शरीराला समान भावाने पोहोचवतो - तस्मात् एताः सप्त अर्चिषः भवन्ति - ह्या अन्नरसापासून सात प्रकारच्या ज्वाला उत्पन्न होतात. (ह्या सात ज्वालांतर्फे डोळे, कान, वाणी, त्वचा, रसना, घ्राणेंद्रिय व मन या सात इन्द्रियांना आपापले कार्य करण्याची शक्ति मिळते) ॥ ५ ॥

हृदि ह्येष आत्मा । अत्रैतदेकशतं नाडीनां तासां शतं शतमेकैकस्या

द्वासप्ततिर्द्वासप्ततिः प्रतिशाखानाडीसहस्राणि भवन्त्यासु व्यानश्चरति ॥ ६ ॥

हि एषः आत्मा हृदि - जीवात्म्याचे शरीरांत मुख्य ठिकाण हृदयस्थानी असते [हे येथे सांगण्याचा उद्देश पुढील मंत्रात स्पष्ट होतो] - अत्र एतत् एक शतम् नाडीनाम् - ह्या हृदयाच्या ठिकाणी मुख्य अशा शंभर नाड्या असतात - तासाम् शतम् शतम् एकैस्याम् - या प्रत्येक नाडीच्या परत शंभर शंभर शाखा असतात - द्वासप्ततिः द्वासप्ततिः प्रतिशाखानाडीसहस्राणि भवन्ति - या प्रत्येक शाखेच्या परत एकेकी बहात्तर हजार उपशाखा असतात - आसु व्यानः चरति -

या सर्व बहात्तर कोटी नाड्यांतून चवथा प्राण म्हणजे व्यान संचार करतो (ह्याचा अर्थ तो सर्व शरीरभर फिरतो) ॥ ६ ॥

अथैकयोर्ध्व उदानः पुण्येन पुण्यं लोकं नयति

पापेन पापं, उभाभ्यामेव मनुष्यलोकम् ॥ ७ ॥

अथ एकया उदानः उर्ध्व (चरति) - वरील नाड्यांव्यतिरिक्त आणखी एक नाडी आहे जी हृदयातून निघून मस्तकाच्या वरपर्यंत असते. ती म्हणजे सुषुम्ना. ह्या नाडीत उदान वायुचा वास असतो - पुण्येन पुण्यम् लोकम् नयति पापेन पापम् - ही नाडी अंतसमयी शुभकर्म केलेल्यांना पुण्यलोकीं घेऊन जाते आणि पाप कर्मे करणाऱ्या लोकांना नरकांत घेऊन जाते - उभाभ्याम् एव मनुष्य लोकम् - ज्यांचे मिश्र कर्म आहे अशांना परत मनुष्य जन्मास घालण्याचे हा उदान वायु काम करतो ॥ ७ ॥

आदित्यो ह वै बाह्यः प्राण उदयत्येष ह्येनं चाक्षुषं प्राणमनुगृह्णानः।

पृथिव्यां या देवता सैषा पुरुषस्य अपानं अवष्टभ्य अन्तरा यदाकाशः स समानो वायुर्व्यानः ॥ ८ ॥

प्राण जसा शरीरात सर्वत्र विभागणी करून रहतो , तसाच तो संपूर्ण विश्वातही निरनिराळ्या देवतांची स्थापना करून

असतोच (प्र.२ मंत्र ५)विश्वात तो आदित्यरूपाने असतो - ह आदित्यः वै बाह्य प्राणः एषः हि एनम् चाक्षुषः प्राणम् अनुगृण्हानः उदयति - शरीराबाहेरील प्राण जो सुर्यरूपाने असतो तो नेत्र, कर्ण इ. ठिकाणी स्थित असलेल्या प्राणावर अनुग्रह करतो तेव्हां तो शरीरांतील प्राण कार्यरत होतो (आणि इन्द्रिये आपापली कार्य करू शकतात) - पृथिव्याम् या देवता सा एषा पुरुषस्य अपानम् अवष्टभ्यः - पृथ्वीची अधिष्ठात्री देवता अग्निच्या आधारें शरीरांतील अपान वायु आपले (अन्न ढकलण्याचे) काम करायला समर्थ होतो - अन्तरा यद् आकाशः सः समानः वायु व्यानः - आदित्य आणि पृथ्वी यांचा मधल्या भाग हे आकाशाचे क्षेत्र. ह्याची देवता म्हणजे आकाश वायु. ह्याचे नियंत्रण समान तसेच सर्व शरीरभर विचरण करणाऱ्या व्यान वायुवर असते. ॥ ८ ॥

तेजो ह वा उदानः तस्मादुपशान्ततेजाः । पुनर्भवं इन्द्रियैर्मनसि संपद्यमानैः॥ ९ ॥

ह तेजः वै उदानः - तेज (उष्णता) ही उदान वायुची देवता - तस्मात् उपशांततेजाः - जेव्हां शरीरातील तेज क्षीण होते - मनसि सम्पद्यमानैः इन्द्रियै पुनर्भवम् - तेव्हां जीवात्मा मुख्य इन्द्रिय मन यांत लीन होतो आणि त्यासहीत पुनर्जन्माला प्राप्त होतो. ॥ ९ ॥

यच्चित्तस्तेनैष प्राणमायाति प्राणस्तेजसा युक्तः । सहात्मना तथासङ्कल्पितं लोकं नयति ॥ १० ॥

एषः यच्चित्तः तेन प्राणम् आयाति - जीवात्म्याच्या अंतसमयी चित्त ज्या विषयावर केन्द्रित असते तोच भाव प्राणामध्ये स्थित होतो - प्राणः तेजसा युक्त आत्मनासह यथासंकल्पितम् लोकम् नयति - तेजयुक्त प्राण मग जिवात्म्याला त्याच्या संकल्पानुसार यथायोग्य योनित जन्माला घालतो. ॥ १० ॥

य एवं विद्वान् प्राणं वेद न हास्य प्रजा हीयते अमृतो भवति तदेषः श्लोकः ॥ ११ ॥

यः विद्वान् एवम् प्राणम् वेद - जो कोणी बुद्धिमान इथवर कथन केलेल्या प्राणाचे रहस्य जाणतो - अस्य प्रजा न हीयते - त्याची प्रजा कधीही नष्ट होत नाही - अमृतो भवति - तो अमर होतो - तत् एषः श्लोकः - ह्या विषयीच पुढील ऋचा आहे. ॥ ११ ॥

उत्पत्तिमायतिं स्थानं विभुत्वं चैव पञ्चधा ।

अध्यात्मं चैव प्राणस्य विज्ञायामृतमश्नुते विज्ञायामृतमश्नुतइति ॥ १२ ॥

प्राणस्य उत्पत्तिम् आयतिम् विभूत्वम् एव - मनुष्य शरीरांत प्राणाची उत्पत्ती कशी होते, तो शरीरात कसा प्रवेश करतो, कशा प्रकारे शरीराला व्यापतो - च (बाह्यम्) स्थानम् एव

अध्यात्मम् पंचधा च विज्ञाय - तो शरीराबाहेरील तसेच शरीरात पांच प्रकारे कसा कसा प्रतिष्ठीत होऊन असतो हे सर्व जो जाणतो - अमृतम् अश्नुते - तो अमृत तत्त्वाला प्राप्त होतो, निरन्तर आनन्दाचा अनुभव घेतो. ॥ १२ ॥

इति प्रश्नोपनिषदि तृतीयः प्रश्नः ॥

प्रश्नोपनिषद्

चतुर्थ प्रश्नः

अथ ह एनम् गार्ग्यः सौर्यायणी पप्रच्छ - यानंतर पिप्पलाद ऋषींना गर्ग कुलोत्पन्न सौर्यायणीने विचारले - भगवन्, एतस्मिन् पुरुषे कानि स्वपन्ति - भगवन् ! ह्यां शरीरात (पुर्वोक्त देवतांपैकी) कोणत्या देवता झोपतात - अस्मिन् कानि जाग्रति - आणि कोणत्या देवता जाग्या राहतात - एषः कतरः देवः स्वप्नान्पश्यति - कुठली देवता स्वप्नातील दृष्यांना पाहते - एतत् कस्य सुखम् भवति - निद्रा अवस्थेत सुख कुणाला होते - सर्वे कस्मिन्नु सम्प्रतिष्ठिताः भवन्ति इति - आणि ह्या सर्व देवता कशाच्या आश्रयाने असतात. ॥ १ ॥

अथ हैनं सौर्यायणि गार्ग्यः पप्रच्छ । भगवन् एतस्मिन् पुरुषे कानि स्वपन्ति ?

कानि एस्मिन् जाग्रति ? कतर एष देवः स्वप्नान् पश्यति ? कस्यै तत् सुखं भवति ?

कस्मिन्नु सर्वे संप्रतिष्टिता भवन्तीति ॥ १ ॥

तस्मै सः उवाच - ते म्हणाले , गार्ग्य, यथा अस्तम् गच्छतः अर्कस्य मरीचयः एतस्मिन् तेजोमण्डले सर्वाः एकी भवन्ति - ज्याप्रमाणे अस्त पावलेल्या सुर्याची कीरणें त्याच्या तेजोमण्डळात एकत्र येतात - उदयतः ताः पुनः पुनः प्रचरन्ति - आणि सुर्योदय झाल्यावर जसें सर्व किरण परत सर्वत्र विखुरतात - एवम् वै तत् - निद्रेंत अगदी त्याचप्रमाणे - तत् सर्वम् परे देवे मनसि एकी भवन्ति - सर्व इन्द्रियेदेखील त्यांचे परम दैवत 'मना'च्या ठिकाणी एकरूप होतात. - तेन तर्हि एषः पुरुषः - आणि त्यामुळे जिवात्मा - न शृणोति न पश्यति - हा ऐकतो ना पाहातो - न जिघ्रति न रसयते न स्पृशते- ना वास घेतो ना स्वाद घेतो ना स्पर्श करतो - न अभिवदते न आदत्ते न आनन्दयते - ना बोलतो ना हाताने घेतो ना मैथुनात रमतो - न विसृजते न इयायते - ना (मलमुत्र) त्यागतो ना चालतो - स्वपिति इति आचक्षते - तो झोपलाय असे लोक म्हणतात. ॥ २ ॥

तस्मै स होवाच । यथा गार्ग्य मरीचयोऽर्कस्यास्तं गच्छतः सर्वा एतस्मिंन् तेजोमण्डर्ल एकीभवन्ति ।

ताः पुनः पुनः उदयतः प्रचरन्त्येवं ह वै तत् सर्वं परे देवे मनस्येकीभवति तेन तर्ह्येष पुरुषो न श्रृणोति

न पश्यति न जिघ्रति न रसयते न स्पृशते नाभिवदते नादत्ते नानन्दयते न विसृजते नेयायते स्वपितीत्याचक्षते ॥ २ ॥

प्राणाग्नय एवैतस्मिन् पुरे जाग्रति । गार्हपत्यो ह वा एषोऽपानो व्यानोऽन्वाहार्यपचनो

यद् गार्हपत्यात् प्रणीयते प्रणयनाद् आहवनीयः प्राणः ॥ ३ ॥

एतस्मिन् पुरे प्राणाग्नयः एव जाग्रति - या शरीररूपी नगरात पांच प्राणरुपी अग्नि मात्र जागृत असतात - ह एषः अपानः वै गाहपत्यः - अपान वायु हा गाहपत्य अग्नि आहे - व्यानः अन्वाहार्यपचनः - व्यान हा अन्वहार्य पचन नामक दक्षिणाग्नि आहे - गाहपत्त्यात् यत् प्रणीयते , आहवनीयः प्रणयनात् प्राणः - यज्ञासाठी लागणाऱ्या अग्निला आहावनीय म्हणतात. आणि तो अग्नि जेव्हां एका ठिकाणाहून उचलून घेऊन जातात त्या उचलून घेऊन जाणाऱ्या अग्निला गाहपत्य अग्नि म्हणतात. आहवनीय अग्नि उचलून आणल्यामुळे प्राणरुप आहे [अर्थ स्पष्ट होत नाही, शोध घ्यावा लागेल] ॥ ३ ॥

यदुच्छ्वासनिःश्वासावेतावाहुतीसमं नयतीति स समानः। मनो ह वाव यजमानः।

इष्टफलमेवोदानः। स एनं यजमानं अहरहर्ब्रह्म गमयति ॥ ४ ॥

यत् उच्छवासनिःश्वासौ एतौ आहुतिः - श्वास व प्रश्वास रुपाने प्राणवायु शरीरांत घेणे व बाहेर सोडणे, ही क्रिया म्हणजे अग्निहोत्ररुपी यज्ञांत टाकलेल्या दोन प्रकारच्या आहुत्या होत. आहुतिद्वारा शरीरांत घेतली जाणारी पोषक द्रव्यें म्हणजे शरीरासाठी लागणारा हवि म्हणतात - समम् नयति इति समानः - समान वायु ही हवि सर्व शरीरभर सम भावाने पोहोंचवतो - ह मनः वाव यजमानः - ह्या सर्व क्रियेचा यजमान म्हणजे मन - इष्टफलम् एव उदानः - आणि त्याचे फळ म्हणजे उदान वायु - सः एनम् यजमानम् अहः अहः ब्रम्ह गमयति - कारण निद्राकाळी हा उदान वायु त्याच्या यजमानाला विश्रांतीरूप फळ म्हणून ब्रह्मसुखासमान सुख पोहोचवतो. ॥ ४ ॥

अत्रैष देवः स्वप्ने महिमानमनुभवति । यद्दृष्टं दृष्टमनुपश्यति श्रुतं श्रुतं एवार्थं

अनुश्रृणोति, देशदिगन्तरैश्च प्रत्यनुभूतं पुनः पुनः प्रत्यनुभवति दृष्टं चादृष्टं च

श्रुतं चाश्रुतं चानुभूतं चाननुभूतं च सच्च असच्च सर्वं पश्यति सर्वः पश्यति ॥ ५ ॥

अत्र स्वप्ने एषः देवः महिमानम् अनुभवति - स्वप्न अवस्थेंत जीवात्मा आपल्या विभूतिचा अनुभव घेतो - यत् दृष्टम् दृष्टम् अनुपश्यति श्रुतम् श्रुतम् एव अर्थम् अनुश्रुणोति - जीं दृष्येें नेहमी पाहिली जातात, जें बरेंच वेळां ऐकण्यात येते - देशदिगन्तरैः प्रत्यनुभूतम् पुनः पुनः प्रतिअनुभवति - जे निरनिराळ्या स्थानी पुनः पुनः अनुभवाला येणारे वेगवेगळे विषय, तसेच - दृष्टम् च अदृष्टम् च श्रुतम् च अश्रुतम् च अनुभूतम् च अन.अनुभूतम् च - पाहिलेली वा कधीही न पाहिलेली दृश्यें , ऐकलेले वा कधी न ऐकलेले, अनुभवलेले वा कधीही प्रत्ययास न आलेले - सत् च असत् च सर्वं पश्यति सर्वः पश्यति - तसेच घडलेल्या अथवा कधीही न घडलेल्या अशा कुठल्याही गोष्टी स्वप्नांत अनुभवतो. कितीतरी घटनांमध्ये तो स्वताः दृश्यांतला हिस्सा बनूनही अनुभवतो. इथे जिवात्म्या शिवाय आणखी कशाचाही सहयोग नसतो. ॥ ५ ॥

स यदा तेजसाऽभिभूतो भवति ।

अत्रैष देवः स्वप्नान्न पश्यत्यथ तदैतस्मिन् शरीरे एतत्सुखं भवति ॥ ६ ॥

सः यदा तेजसा अभिभूतः भवति - मन जेव्हां तेजानें (उदान वायुने) व्याप्त होते - अत्र एषः देवाः स्वप्नान् न पश्यति - तेव्हां मनाचे सर्व व्यापार थांबतात. तेव्हां मन कार्यरत नसल्यामुळे जिवात्मा स्वप्ने पाहात नाही (स्वप्न पडत नाही) - अथ तदा एतस्मिन् शरीरे एतत् सुखम् भवति - या वेळीं शरीरांत जीवात्म्याला सुषुप्ती सुखाचा अनुभव होतो. ॥ ६ ॥

स यथा सोभ्य ! वयांसि वसोवृक्षं संप्रतिष्ठन्ते ।

एवं ह वै तत् सर्वं पर आत्मनि संप्रतिष्ठते ॥ ७ ॥

सोम्य, यथा वयांसि वासोवृक्षम् संप्रतिष्ठन्ते - जसे पुष्कळ पक्षी संध्याकाळी आपल्या निवासरूपी वृक्षाचा आश्रय करून विश्राम पावतात - ह एवम् वै तत् सर्वम् परे आत्मनि सम्प्रतिष्ठन्ते - ठीक त्याच प्रमाणे सर्वकांही (सर्व जगत्/विश्व) परमेश्वराचा आश्रय घेतात (कारण परम-आत्माच सर्वांचा परम आश्रय आहे) ॥ ७ ॥

पृथिवी च पृथिवीमात्रा चापश्चापोमात्रा च तेजश्च तेजोमात्रा च वायुश्च वायुमात्रा चाकाशश्च

आकाशमात्रा च चक्षुश्च द्रष्टव्यं च श्रोत्रं च श्रोतव्यं च घ्राणं च घ्रातव्यं च रसश्च रसयितव्यं च

त्वक्च स्पर्शयितव्यं च वाक्च वक्तव्यं च हस्तौ चादातव्यं च उपस्थश्च आनन्दयितव्यं च

पायुश्च विसर्जयितव्यं च पादौ च गन्तव्यं च मनश्च मन्तव्यं च बुद्धिश्च बोद्धिव्यं च अहङ्कारश्च

अहङ्कर्तव्यं च चित्तं च चेतयितव्यं च तेजश्च विद्योतयितव्यं च प्राणश्च विधारयितव्यं च ॥ ८ ॥

पृथिवी च पृथिवीमात्रा च आपश्च आपोमात्रा च तेजश्च तेजोमात्रा च वायुश्च वायुमात्रा च आकाशश्च आकाशमात्रा च - पृथिवी, आप, तेज, वायु आणि आकाश आपापल्या तन्मात्रा गन्ध, रस, रूप, स्पर्श व शब्द यांसहीत - चक्षुश्च द्रष्टव्यं च - डोळे तसेच त्याला दिसणारे सर्व काही - श्रोत्रं च श्रोत्रव्यं च घ्राणं च घ्रातव्यं च रसश्च रसयितव्यं च त्वक्च स्पर्शयितव्यं च वाक्च वक्तव्यं च हस्तौ च आदातव्यं च उपस्थश्च आनन्दयितव्यं च पायुश्च विसर्जयितव्यं च पादौ च गन्तव्यं च - तसेच कान, नाक, रसना, त्वचा, हात, पाय, उपस्थ, गुदा एत्यादि इन्द्रियें त्यांच्या विषयांसहीत - मनश्च मन्तव्यं च - मन व ते कल्पना करू शकणारे सर्व काही - बुद्धिश्च बोद्धव्यं च - बुद्धि व ज्ञात होऊ शकणारे सर्व काही - अहंकारश्च अहंकर्तव्यं च चित्तं च चेतयितव्यं च तेजश्च विद्योतयितव्यं च प्राणश्च विधारयितव्यं च - अहंकार, चित्त, तेज व प्राण त्यांच्या विषयांसहीत सर्व काही परमेश्वराचा आश्रय करून असतात ॥ ८॥

एष हि द्रष्टा स्प्रष्टा श्रोता घ्राता रसयिता मन्ता बोद्धाकर्ता

विज्ञानात्मा पुरुषः । स परेऽक्षर आत्मनि संप्रतिष्ठते ॥ ९ ॥

एषः द्रष्टा स्प्रष्टा श्रोता घ्राता रसयिता मन्ता बोद्धा कर्ता विज्ञानात्मा पुरुषः - जो कोणी पाहणारा, स्पर्श करणारा, ऐकणारा, वास घेणारा, स्वाद घेणारा, मनन करणारा, जाणून घेणारा, कर्म करणारा हा विज्ञानत्मा पुरुष आहे (जीवत्मा आहे) - स हि परे अक्षरे आत्मनि संप्रतिष्ठते - हा पुरुष त्या अविनाशी परब्रह्म परमेश्वराच्याच आश्रयाने राहातो. ॥ ९ ॥

परमेवाक्षरं प्रतिपद्यते स यो ह वै तदच्छायं अशरीरं अलोहितं शुभ्रमक्षरं

वेदयते यस्तु सोम्य ! स सर्वज्ञः सर्वो भवति । तदेष श्लोकः ॥ १० ॥

ह यः वै तत् अच्छायम अशरीरम् अलोहितं शुभ्रम् अक्षरम् वेदयते - निश्चितपणे जो कोणी त्या छायारहित, शरीररहित, रंगरहित विशुद्ध अविनाशी परमात्म्याला जाणतो - सः परम अक्षरम् एव प्रतिपद्यन्ते - तो त्या परम अविनाशी परमात्म्यालाच प्राप्त होतो - सोम्य यः तु सः सर्वज्ञः सर्वः भवति - हे प्रिय शिष्या, जो कोणी अशा परमेश्वराला जाणणारा आहे

तो सर्वज्ञ आणि सर्व व्यापी होतो - तत् एषः श्लोकः - हे स्पष्ट करणारा पुढचा श्लोक. ॥ १० ॥

विज्ञानात्मा सह देवैश्च सर्वैः प्राणा भुतानि संप्रतिष्ठन्ति यत्र ।

तदक्षरं वेदयते यस्तु सोम्य ! स सर्वज्ञः सर्वमेवाविवेशेति॥ ११ ॥

यत्र प्राणाः भूतानि च सर्वैः देवैः सह विज्ञात्मा संप्रतिष्ठन्ते - सर्व प्राण, पंचमहाभूते, अंतःकरणासहीत सर्व इन्द्रिये, या सर्वांसहीत जिवात्मा ज्याचा आश्रय घेतो - सोम्य, तत् अक्षरम् यः तु वेदयते - असा जो कोणी त्या परमात्म्याला जाणतो - सः सर्वज्ञ सर्वम् एव आविवेश इति - तो सर्वज्ञ असून सर्वस्वरूप परमेश्वरांतच प्रवेश करतो ॥ ११ ॥

इति प्रश्नोपनिषदि चतुर्थः प्रश्नः ॥

प्रश्नोपनिषद्

पंचम प्रश्नः

अथ ह एनम् शैब्यः सत्यकामः पप्रच्छ - यानंतर पिप्पलाद ऋषींना शीबी ऋषीचा पुत्र सत्यकाम याने विचारले - भगवन् ,

मनुष्येषु सः यः वै प्रायणान्तम् तत् ओंकारम् अभिध्यायीत - हगवंत ! मनुष्यांपैकी जो कोणी अंतकाळपर्यंत निष्ठेने त्या ओंकाराचे ध्यान करतो - सः तेन कतमम् लोकम् वाव जयति - त्या उपासनेद्वारा त्याची कोणत्या लोकीं गती होते. ॥ १ ॥

अथ हैनं शैब्यः सत्यकामः पप्रच्छ । स यो ह वै तद् भगवन् मनुष्येषु

प्रायणान्तं ओङ्कारं अभिध्यायीत । कतमं वाव स तेन लोकं जयतीति ॥ १ ॥

तस्मै सः उवच , एतत् वै यत् ओंकार परम् ब्रह्म च अपरम् - अहर्षी म्हणाले, सत्यकामा , निश्चितपणे हा जो ओंकार आहे, तो परब्रह्म आणि अपर ब्रह्मही आहे - तस्मात् विद्वान् एतेन् एव आयतनेन एकतरम् अन्वेति - शा प्रकारे ज्ञान असलेला (जाणणारा) आपल्या श्रद्धेप्रमावे कोणत्यातरी एकाचे (पर वा अपर) अनुष्ठान करतो. ॥ २ ॥

तस्मै स होवाच - एतद्वै सत्यकाम परं चापरं च ब्रह्म यदोङ्कारः ।

तस्माद् विद्वान् एतेन एव आयतनेन एकतरं अन्वेति ॥ २ ॥

स यद् एकमात्रं अभिध्यायीत स तेनैव संवेदितः तूर्णमेव जगत्यां अभिसंपध्यते।

तं ऋचो मनुष्यलोकं उपनयन्ते स तत्र तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया संपन्नो महिमानं अनुभवति॥ ३ ॥

सः यदि एकमात्रम् अभिध्यायीत - ओ उपासक जर ओं कारच्या एका मात्रेचे ध्यान करेल (एकमात्रेचा आशय आहे भूलोकीच्या ऐश्वर्यप्राप्तीसाथी) - सः तेन एव संवेदितः तूर्णम् एव जगत्याम् अभिसम्पद्यते - ओ आपल्या उपासनेद्वारा त्याच्या ध्येयाप्रमाणें लवकरच पृथ्वीवर (मनुष्यलोकीं) जन्म घेत - तम् ऋचः मनुष्यलोकम् उपनयन्ते - याला ऋग्वेदांतील ऋचा मनुष्यदेह प्राप्त करून देतात, जिथे तो परत शुभ कर्मे करायला समर्थ बनतो (त्याचा परत नीच योनित जन्म होत नाही). ॥ ३ ॥

अथ यदि द्विमात्रेण मनसि संपद्यते सोऽन्तरिक्षं यजुर्भिः उन्नीयते

सोमलोकम् । स सोमलोके विभूतिं अनुभूय पुनरावर्तते॥ ४ ॥

अथ यदि द्विमात्रेण (अभिध्यायीत) मनसि संपद्यते - ओ ओं काराच्यादोन मात्रांचे ध्यान करतो, तो चंद्रलोकी (स्वर्गात) जातो - सः यजुर्भिः अन्तरीक्षम् सोमलोकम् उन्नीयते - ओ यजुर्वेदाच्या मंत्रांद्वारा स्वर्गलोकींचा भोग भोगतो - सः

सोमलोके विभूतिम् अनुभूय: पुन: आवर्तते - आणि स्वर्गलोकींचे ऐश्वर्य भोगून पुण्यक्षय झाल्यावर पूर्व कर्मानुसार मनुष्य वा इतर कोणत्याही नीच योनित जन्माला येतो. ॥ ४ ॥

यः पुनरेतं त्रिमात्रेण ॐ इति एतेन एव अक्षरेण परं पुरुषं अभिध्यायीत स तेजसि सूर्ये संपन्नः ।

यथा पादोदरस्त्वचा विनिर्भुच्यत एवं ह वै स पाप्मना विनिर्भुक्तः स सामभिः उन्नीयते ब्रह्मलोकं

स एतस्मात् जीवघनात् परात्परं पुरिशयं पुरुषमीक्षते । तदेतौ श्लोकौ भवतः ॥ ५ ॥

पुन: य: त्रिमात्रेण ओम् इति एतेन अक्षरेण एव एतम् परम् पुरुषम् अभिध्यायीत - आणि जो ओम् अक्षराच्या (तीन्ही मात्रांसहीत) परम पुरुषाचे निरन्तर ध्यान करतो - स: तेजसि सूर्ये सम्पन्न: - तो तेजोमय (परमधाम) सूर्यलोकाची प्राप्ती करतो. - यथा पादोदर: त्वचा विनिर्मुच्यते - ज्याप्रमाणे सर्प कात टाकतो - एवम् ह् वै स: पाप्मना विनिर्मुक्त स: सामभि: ब्रह्मलोकम् उन्नीयते - त्याचप्रमाणे तो पापमुक्त होतो आणि साममंत्रांद्वारे ब्रह्मलोकी जातो - स: एतस्मात् जीवघनात् परात् परम् पुरिशयम् पुरुषम् ईक्षते - त्याला सर्व प्राणीसमुदायाच्या अंतर्यामी स्थित असलेल्या उत्तमांतील उत्तम अशा श्रेष्ठ परम पुरुषाचा साक्षात्कार होतो - तत् एतौ श्लोकौ भवत: - उढील

दोन श्लोकात हीच गोष्ट आणखी स्पष्ट करण्यात आली आहे. ॥ ५ ॥

तिस्रो मात्रा मृत्युमत्यः प्रयुक्ता अन्योन्यसक्ताः अनविप्रयुक्ताः ।

क्रियासु बाह्याभ्यन्तरमध्यमासु सम्यक् प्रयुक्तासु न कम्पते ज्ञः ॥ ६ ॥

तिस्त्र मात्राः अन्यान्यसक्ताः प्रयुक्ताः अनविप्रयुक्ताः मृत्युमत्यः - ॐ काराच्या तिन्ही मात्रांचे संयुक्तिक वा स्वतंत्रपणे ध्यान केले असतां त्याची परीणती मृत्युमध्येंच होते (म्हणजेच परत पुनर्जन्म, मुक्ती नाही) - बाह्याभ्यंतरमध्यमासु क्रियासु सम्यक्प्रयुक्तासु ज्ञः न कम्पते - अंतर्बाह्य आणि योग्य प्रकारें तिन्ही मात्रांच्या एकत्रित ध्यानाने परमेश्वराचे ज्ञान झालेला भयमुक्त होतो (माणसाला सर्वात मोठे भय मरणाचे असते, त्या मृत्युभयानेतो कधी विचलित होत नाही). ॥ ६ ॥

ऋग्भिरेतं यजुर्भिरन्तरिक्षं सामभिर्यत् तत् कवयो वेदयन्ते । तं ओङ्कारेण एव

आयतनेन अन्वेति विद्वान् यत्तच्छान्तं अजरं अमृतं अभयं परं चेति ॥ ७ ॥

ऋग्भिः एतम् - एकमात्रामय ध्यानाने ऋग्वेद ऋचांद्वारे हाच लोक (मनुष्यलोक) - यजुर्भिः अन्तरिक्षम् - द्विमात्रा ध्यानाने यजुर्वेद मंत्रांद्वारे स्वर्गलोक - सामभिः तत् - अणि एक अक्षरी तिन्ही मात्रांसहीत (सम्यक्प्रयुक्तासु) ध्यानाने सामवेद मंत्रांद्वारा ब्रह्मलोक - यत् कवयः वेदयन्ते - याप्रमाणे जाणणारे ज्ञानी लोक - तत् अन्वेति - या परम पुरुषाची प्राप्ती करतात. - यत् तत् शान्तम् अजरम् अमृतम् अभयम् च परम् इति - ओ शान्त, वार्धक्यरहित, मृत्युरहित भयरहित् आणि सर्वश्रेष्ठ आहे तो म्हणजे परम पुरुष होय. ॥ ७ ॥

इति प्रश्नोपनिषदि पञ्चमः प्रश्नः ॥

प्रश्नोपनिषद्

षष्ठ प्रश्नः

अथ हैनं सुकेशा भारद्वाजः पप्रच्छ । भगवन् हिरण्यनाभः कौसल्यो राजपुत्रो

मामुपेत्यैतं प्रश्नमपृच्छत । षोडशकलं भारद्वाज ! पुरुषं वेत्थ ? तमहं कुमारं

अब्रुवं नाहमिमं वेद । यदि अहमिममवेदिषं कथं ते नावक्ष्यमिति । समूलो

वा एष परिशुष्यति योऽनृतमभिवदति तस्मान्नार्हम्यनृतं वक्तुम्।

स तूष्णीं रथमारुह्य प्रवव्राज। तं त्वा पृच्छामि क्वासौ पुरुष इति॥ १॥

अथ ह एनम् भारद्वाजः सुकेशा पप्रच्छ - यानंतर पिप्पलाद ऋषींना भारद्वाज कुलोत्पन्न सुकेशा याने विचारले - भगवन्, कौसल्यः राजपुत्रः हिरण्यनाभः माम् उपेत्य एतम् प्रश्नम् अपृच्छत - भगवन्त, कोसल देशाचा राजकुमार हिरण्यनाभ एकदा माझ्याकडे आला आणि त्याने हा प्रश्न विचारला - भारद्वाज, षोडशकलम् पुरुषम् वेत्थ - भारद्वाज, काय तू सोळा कळा असलेल्या पुरुषाला जाणतोस - तम् कुमारम् अहम् अब्रूवम् अहम् न वेद - या राजकुमाराला मी म्हणालो कीं मी (असा पुरुष) जाणत नाही - यदि अहम् इदम् अवेदिषम् ते कथम् न अवक्षम् इति - जर मला माहीत असते तर मी का सांगणार नाही - यः अनृतम् अभिवदति एषः वै समूलः परिशुष्यति - जो खोटे बोलतो त्याचा मुळासकट नाश होतो - तस्मात् अनृतम् वक्तुम् न अर्हामि - म्हणून मी खोटे बोलुं शकत नाही - सः तूष्णीम् रथम् आरुह्य प्रवव्राज - तो चुपचाप रथावर चढून परत गेला - तम् त्वा पृच्छामि असौ पुरुषः क्व इति - हेंच मी आंता आपल्याला विचारतो की, हा सोळा कळा असलेला पुरुष कुठे असतो॥ १॥

तस्मै स होवाच । इह एवान्तःशरीरे सोभ्य स पुरुषो यस्मिन् एताः षोडशकलाः प्रभवन्तीति ॥ २ ॥

तस्मै सः उवाच - महर्षी त्याला म्हणाले - सोम्य, इह अंतःशरीरे एव सः पुरुषः - हे प्रिय शिष्या, तो तर ह्या शरीरांतच असतो - यस्मिन् एताः षोडश कलाः प्रभवन्ति इति - त्याचांत ह्या सोळा कळा प्रकट होतात. ॥ २ ॥

स ईक्षांचक्रे । कस्मिन् अहमुत्क्रान्त उत्क्रान्तो भविष्यामि कस्मिन्वा प्रतिष्टिते प्रतिष्टस्यामीति ॥ ३ ॥

सः ईक्षांचक्रे - प्रळयानंतर परत सर्गस्थितीच्या वेळीं परमेश्वराने विचार केला - कस्मिन् प्रतिष्ठिते प्रतिष्ठास्यामि इति - निश्चितपणे काय / कशाच्या प्रतिष्ठापनाने माझ्या अबाधित सत्तेची प्रचिती येईल वा कस्मिन् उत्क्रान्ते अहम् उत्क्रान्तः भविष्यामि - इश्चित्पणे शरीरातूंन काय बाहेर पडल्यावर मी तिथून बाहेर पडल्यासारखे होईल ॥ ३ ॥

स प्राणं असृजत प्राणात् श्रद्धां खं वायुर्ज्योतिरापः पृथिवीन्द्रियंमनः ।

अन्नं अन्नाद्वीर्यं तपो मन्त्राः कर्मलोका लोकेषु च नाम च ॥ ४ ॥

सः प्राणम् असृजत - आधी त्याने प्राणाची निर्मिती केली - प्राणात् श्रद्धां - त्यानंतर श्रद्धेची - खम् वायु ज्योतिः आपः पृथिवी- मग क्रमाने आकाश, वायु, तेज, जल आणि पृथिवी या पंचमहाभूतांची - मनः इन्द्रियम् - मन (चतुष्टय) व इन्द्रिय समुदाय - अन्नम् अन्नात् वीर्यम् - अन्न आणि त्यापासून वीर्य - तपः मंत्राः कर्म च लोकाः च लोकेषु नाम - आणि मग तप, मंत्र, विविध कर्मे, लोक आणि नामाची निर्मिती केली. [अशा प्रकारे सोळा कळांची निर्मिती करून परमेश्वर शरीरांत (हृदयस्थानी) प्रविष्ट झाला. ब्रह्माण्डही ह्या सोळा कळांनी व्याप्त आहे म्हणून प्रत्येक शरीर हे ब्रह्माण्डाचे प्रतीक आहे. म्हणून मनुष्यच म्हणू शकतो - अहम् ब्रह्मास्मि] ॥ ४ ॥

स यथेमा नद्यः स्यन्दमानाः समुद्रायणाः समुद्रं प्राप्याः तं गच्छन्ति भिद्येते तासां नामरुपे

समुद्र इत्येवं प्रोच्यते । एवमेवास्य परिद्रष्टुरिमाः षोडशकलाः पुरुषायणाः पुरुषं प्राप्यास्तं गच्छन्ति

भिद्येते चासां नामरूपे पुरुष इत्येवं प्रोच्यते स एषोऽकलोऽमृतो भवति तदेष श्लोकः ॥ ५ ॥

यथा इमा नद्यः समुद्रायणाः स्यंदमानाः समुद्रम् प्राप्य अस्तम् गच्छति - या प्रमाणे या नद्या समुद्राला मिळायच्या उद्देशाने समुद्राच्या दिशेने वाहात जात समुद्रांत विलीन होतात -

तासाम् नामरूपे भिद्येते समुद्र एव इति प्रोच्यते - मग त्यांचे नांव रूप नष्ट होते आणि मग त्या पुढे समुद्र म्हणूनच ओळखल्या जातात - एवम् एव अस्य परिद्रष्टः इमाः षोडशः कलाः - त्याचप्रमाणे परमेश्वर हेच ध्येय असलेल्या ह्या सोळा कळा - पुरुषायणाः पुरुषम् प्राप्य अस्तम् गच्छति - स्वभावताः ज्यांची गती परमपुरुषाकडे असलेल्या त्या कळा मग परमपुरुषाशी एकरूप होतात - च आसाम् नामरूपे भिद्येते - मग त्यांचे नामरूप आपल्या वैशिष्ट्यांसहीत नष्ट होतात - पुरुषः इति एवम् प्रोच्यते - त्यांच्या अस्तित्वाला पुढे परम पुरुष असेंच म्हणतात - सः एषः अकलः अमृतः भवति - असा कलारहित मनुष्य मग अमर परमत्माच होऊन जातो - तत् एषः श्लोकः - हेच स्पष्ट करणारा पुढचा श्लोक. ॥ ५ ॥

अरा इव रथनाभौ कला यस्मिन् प्रतिष्टिताः । तं वेद्यं पुरुषं वेद यथा मा वो मृत्युःपरिव्यथा इति ॥ ६ ॥

अरा इव रथनाभौ - ज्याप्रमाणे रथचक्राच्या आसाला आरे जोडलेले असतात - कला यस्मिन् प्रतिष्ठिताः - अगदी त्याप्रमाणे परम पुरुष परमेश्वरात सर्व कला प्रतिष्ठित असतात - तं वेद्यं पुरुषं वेद - म्हणून त्या परमेश्वराला जाणा - म्हणजे मृत्युचे तुम्हाला मृत्यूची व्यथा, अर्थात् भय राहणार नाही.

तान् होवाच - एतावदेव अहं एतत् परं ब्रह्म वेद । नातः परमस्तीति ॥ ७ ॥

ह तान् उवाच एतत् परब्रह्म - मग ते महर्षी त्या सर्वांना म्हणाले, असा आहे परब्रह्म परमेश्वर - अहम् एतावत् एव वेद - मी एव्हढेंच जाणतो - अतः परम् न आस्ति इति - (माझ्यामते) ह्यापेक्षा श्रेष्ठ असे कुठलेच दुसरे तत्त्व नाही. ॥ ७ ॥

ते तमर्चयन्तः त्वं हि नः पिता योऽस्माकं अविद्यायाः

परं पारं तारयसीति । नमः परमऋषिभ्यो नमः परमऋषिभ्यः ॥ ८ ॥

ते तम् अर्चयन्तः - या सहाही ऋषींनी महर्षी चीपूजा केली - त्वम् हि नः पिता - तूंच आम्हां सर्वांचा पिता आहेस - अविद्यायाम् परम् पारम् तारयसि - ज्याने आम्हाला अज्ञानाच्या पलिकडे नेले - नमः परम् ऋषिभ्यो नमः परम ऋषिभ्यः - तुम्हाला आमचा नमस्कार असो , आमचा नमस्कार असो. द्विरुक्तिने उपनिषद संपल्याचे सूचित केले आहे. ॥ ८ ॥

इति प्रश्नोपनिषदि षष्ठः प्रश्नः ॥

इति प्रश्नोपनिषद समाप्ता ॥

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयामदेवा भद्रं पष्येमाक्षभिर्यजत्राः ।

स्थिरैरङ्गैस्तुष्टुवाँसस्तनूभिर्व्यशेमदेवहितं यदायुः ॥

स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः ।

स्वस्ति नस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ॥

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥